महावितरण

# जाहीर सूचना

आय.टी.आय. शिकाऊ उमेदवार म्हणून भरती प्रक्रिया संबंधी (2019-2020) करीता महावितरण प्रविभागीय कार्यालय गडचिरोली यांच्या आस्थापनेवरील विजतंत्री / तारतंत्री / कोपा (COPA) या प्रशिक्षणार्थी शिकाऊ उमेदवार पदाच्या एकूण 108 जागा भरण्यासाठी दि. 26.11.2019 ते 05.12.2019 पर्यंत रोजी 05.30 बाजेपर्यंत http://www.apprenticeship.gov.in वर स व सु मंडळ गडचिरोली अंतर्गत आस्थापना रजिस्ट्रेशन क्र. E10162704140 आलापल्ली विभाग / क्र. E04172702328 गडचिरोली विभाग / क्र. E04172702254 ब्रम्हपूरी विभाग येथील ऑनलाईन (Online) अर्ज मागविण्यात येत आहे.

Designated Trade हा ELECTRICIAN / WIREMAN / COPA करीता शिकाऊ उमेदवारांची कालावधी हा 1 वर्षाकरीता (2019-2020) करीता असून जागा खालीलप्रमाणे आहे. विजतंत्री ELECTRICIAN-53, तारतंत्री WIREMAN-40, कोपा COPA-15 **1)** शैक्षणिक अर्हता :– महाराष्ट्र राज्य माध्यमिक शालांत परिक्षा किंवा तत्सम परिक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक व राष्ट्रीय व्यवसाय प्रशिक्षण परिषद (NCVT) नवी दिल्ली मान्यता प्राप्त औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतून विजतंत्री / तारतंत्री / कोपा या व्यवसायात उत्तीण असणे आवश्यक आहे. **2)** वयोमर्यादा 18 ते 33 वर्ष मागासवर्गीयासाठी 05 वर्ष शिथीलक्षम. **3)** विद्यावेतन नियमाप्रमाणे लागू राहील. **4)** पद कमी जास्त करण्याचा व भरती प्रक्रियेशी निगडीत असलेले सर्व अधिकारी व्यवस्थापन राखून ठेवीत आहेत व सदरचा निर्णय कोणत्याही प्रकारे उमेदवारास कळविल्या जाणार नाही. **5)** एस.एस.सी उत्तीर्ण गुणपत्रीका व प्रमाणपत्राची प्रत आधारकार्डच्या नावाशी सुसंगत असलेली माहिती भरावी. **6)** आय.टी.आय. उत्तीर्ण प्रमाणपत्राची साक्षांकीत प्रत (चार सेमिस्टर गुणपत्रिका). **7)** उमेदवाराने मागासप्रवर्गात अर्ज केला असल्यास जात प्रमाणपत्राची साक्षांकीत केलेली छायांकीत प्रत. **8)** भरती प्रक्रिये दरम्यान उमेदवाराने राजकीय किंवा इतर अधिकाऱ्यांकडून दबाव आणल्यास आपली उमेदवारी रद्द करण्यात येईल याची नोंद घ्यावी. उमेदवारांनी ऑनलाईन (Online) अर्ज करतांना पोर्टलवर आवश्यक मुळ प्रमाणपत्र स्कॅन करून योग्य रितीने अपलोड करणे बंधनकारक आहे. वरील कालावधीत ऑनलाईन (Online) अर्ज सादर न केल्यास अशा अर्जाचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी. प्रणाली मध्ये बदल झाल्यामुळे या आधी ज्या उमेदवाराने ऑनलाईन (Online) अर्ज सादर केले असेल त्यांनी पुन्हा अर्ज सादर करणे आवश्यक आहे याची नोंद घ्यावी. गडचिरोली / चंद्रपूर जिल्हा करीता प्राधान्य राहील. शिकाऊ उमेदवारांची निवड ही एस.एस.सी. व आ.टी.आय. गुणांच्या टक्केवारी (Merit list) नुसार व प्रत्यक्ष मुलाखती द्वारे वरील अटी व शर्तीच्या अधीन राहून प्रवर्गनिहाय निवड केली जाईल याची नोंद घ्यावी.

**अधिक्षक अभियंता, सं.व.सु.मंडळ, म.रा.वि.वि.कं.मर्या., प्रशासकीय इमारत, पोटेगाव रोड, गडचिरोली – 442605**